।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

जा.क्र.रा.शा./बीओएस/९४/४/एम.एम.-२/१५३ दिनांक : १०.१.१९९४

प्रति,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयांचे मा.प्राचार्य

यांसी–

विषय :– तृतीय वर्ष बी.ए. राज्यशास्त्र स्पेशल पेपर–४ मधील प्रॅक्टीकल.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार व मला प्राप्त झालेल्या आदेशावरुन कळविण्यात येते की, तृतीय वर्ष बी.ए. राज्यशास्त्र या विषयाच्या स्पेशल पेपर–४ मध्ये प्रॅक्टीकल घेण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. तृतीय वर्ष बी.ए. राज्यशास्त्र या विषयाचा स्पेशल पेपर–४ मधील प्रॅक्टीकल घेण्याच्या दृष्टीने खालील बदलास मान्यता देण्यांत आली असून संबंधित विषयास किमान २ वर्गाची इतर विद्यार्थी संख्या असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अटी घालून विषय बदलास मान्यता द्यावी असे ठरले आहे. राज्यशास्त्र तृतीय वर्ष कला १९९४–९५ पासून सुरु करावयाचा अभ्यासक्रम :–

जी–३ आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत [ अभ्यासक्रम जुनाच आहे]

किंवा

आंतरराष्ट्रीय संबंध [१९४५ ते १९९२] [अभ्यासक्रम जुनाच आहे].

एस–३ – भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था [ अभ्यासक्रम तोच ].
फक्त पेपर क्र.एस–४ ऐवजी एस–३ केला आहे.

किंवा.

नवीन – पाश्चिमात्य राजकीय विचारवंत.
विभाग–१ : प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हेली व हाब्ज.
विभाग–२ : हेगेल, जे.एस.मील, मार्क्स व टी.एच.ग्रीन.

एस–४ – आधुनिक सामाजिक राजकीय विश्लेषण
( Modern Socio-Political Analysis)
पेपरचे नांव बदलून जुनाच अभ्यासक्रम कायम करण्यांत आला आहे व
एस–३ ऐवजी एस–४ करण्यांत आला आहे.

...२

तृतीय वर्ष राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यासक्रम जी-३ साठी :-

आधुनिक भारतीय विचारवंत

किंवा

आंतरराष्ट्रीय संबंध [ १९४५ ते १९९२ ]

एस-३ : भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था किंवा.

पाश्चिमात्य राजकीय विचारवंत.

अशा प्रकारचे पर्यायी अभ्यासक्रम सुचविला आहे. परंतु महाविद्यालयांने शक्यतो कोणताही एकच पर्यायी विषय शिकवावा व त्यासाठी संबंधित विषयाला किमान एका वर्गाची तरी विद्यार्थी संख्या असणे आवश्यक आहे. ही अट पूर्ण होत असेल तरच दोन्ही पर्यायी विषय एकाच महाविद्यालयात शिकविता येतील. कृपया याची नोंद घ्यावी.

मा. प्राचार्य यांना विनंती की, सदरचा बदल सर्व संबंधित प्राध्यापकांच्या व विद्यार्थ्यांच्या नजरेस आणावा व त्यानुसार कार्यवाही करावी.

आपला विश्वासू,

उप कुलसचिव.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१] मा. अधिष्ठाता, मानस, निती व समाज विज्ञान विद्याशाखा, उ. म. वि., जळगांव.
२] मा. सदस्य, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ, उ. म. वि., जळगांव.
३] मा. कुलसचिव, उ. म. वि., जळगांव.
४] मा. उपकुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध/उत्तरार्ध, प्रशासन, शैक्षणिक विभाग, उ. म. वि., जळगांव.
५] मा. सहा. कुलसचिव, परीक्षा- पूर्वार्ध/उत्तरार्ध, प्रशासन, शैक्षणिक, पात्रता, सभा व अभिलेख विभाग, उ. म. वि., जळगांव.

दुबासा./-

" अंतरी पेटवू ज्ञानज्योत "
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

दिनांक १०. ०१ १९९४

जा. क्र. उमवि/बी. एड्. /प्रवेश/९४/६/२५/ १५६

प्रति,

मा० प्राचार्य,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेली
शिक्षण/शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,

यांसी. . .

विषय :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिक्षेत्रांतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये केन्द्रीय पध्दतीने प्रवेश देण्याबाबत ...

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार व मला प्राप्त झालेल्या आदेशावरुन कळविण्यांत येते की; मा. कार्यकारी परिषद ठराव क्र. १२२३/९३ दिनांक २४. १२. ९३ अन्वये शैक्षणिक वर्ष १९९४-९५ पासून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिक्षेत्रांतील शिक्षणशास्त्र/शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये केंद्रीय पध्दतीने प्रवेश देण्याचे निश्चित ठरविण्यांत आले असून त्या अनुषंगाने केंद्रीय पध्दतीने प्रवेश देण्याकरितां खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आले आहेत.

१] उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिक्षेत्रांतील सर्व महाविद्यालयांकरिता विद्यापीठाने एकत्रित एक अशी जाहीरात देवून विद्यार्थ्यांकडून मुदतीत विद्यापीठाकडे अर्ज मागवावेत. त्यासाठीं विद्यापीठाने विद्यार्थ्यांना माहितीपत्रक व प्रवेश अर्ज द्यावेत.

२] प्रत्येक विद्यार्थ्यास प्रवेशासाठी १० महाविद्यालयांची पर्यायी नावे प्रवेश अर्जात देता येतील.

३] विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन प्रत्येक महाविद्यालयास विद्यार्थ्यांची यादी पाठवावी.

४] तद्नंतर सध्या असलेल्या प्रचलित नियमाप्रमाणे त्या त्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत परंतु मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठ स्तरावर मुलाखती घेऊनच संबंधित महाविद्यालयांना प्रवेशाच्या याद्या पाठवाव्यात. सदर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या मुलाखतीच्या वेळी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना मुलाखतीसाठीं महाविद्यालयाच्या खर्चाने बोलवावे असे ठरले. अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांची प्रचलित नियमाप्रमाणे विद्यापीठातर्फे मुलाखती घेतल्या जातील.

...२

५] ज्या तालुक्यात विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये असतील त्या महाविद्यालयात त्याच तालुक्यातील विद्यार्थ्यांना प्रचलित नियमात आवश्यक ते बदल करुन प्राधान्याने प्रवेश देण्यासाठी विचार करण्यांत यावा असे ठरले.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये केंद्रीय पध्दतीने प्रवेश देण्याच्या संदर्भात घेण्यांत आलेले उपरोक्त निर्णय आपल्या माहितीसाठी पाठविण्यांत आले असून त्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठामार्फत करण्यांत येणार आहे कृपया याची नोंद घ्यावी व सर्वांनी विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती. जास्त सविस्तर माहिती नंतर कळविण्यांत येईल.

कळावे,

आपला विश्वासू,

[श्री. प. जोगळेकर],
कुलसचिव.

<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर :-</u>

१] मा. अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, उ. म. वि., जळगांव.

२] मा. अध्यक्ष व सदस्य, बी. एड्. प्रवेश समिती, उ. म. वि., जळगांव.

३] मा. उप कुलसचिव, परीक्षा [पूर्वार्ध/उत्तरार्ध], प्रशासन, शैक्षणिक, पात्रता विभाग, उ. म. वि., जळगांव.

४] मा. सहाय्यक कुलसचिव, परीक्षा [पूर्वार्ध/उत्तरार्ध], प्रशासन, शैक्षणिक, पात्रता, व सभा व अभिलेख विभाग, उ. म. वि., जळगांव.

बोरसे/*

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

जा.क्र. संस्कृत/अ.मं./९४/६/अे-५/१४१ दिनांक : १०.१.१९९४

प्रति,

१] मा.प्राचार्य, एम.जे.कॉलेज, जळगांव.
२] मा.प्राचार्य, एस.एस.व्ही.पी.चे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, धुळे.
३] मा.प्राचार्य, जयहिंद महाविद्यालय, धुळे.
४] मा.प्राचार्य, विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

विषय :- संस्कृत व अर्धमागधी पुस्तक व अभ्यासक्रमाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार व मला प्राप्त झालेल्या आदेशावरुन कळविण्यांत येते की, संस्कृतचे "चित्रवाणी वैभवम्" हे पुस्तक उशिरा उपलब्ध झाल्यामुळे प्रथम वर्षासाठी १९९३-९४ करितां पुणे विद्यापीठाचे "अमर भारती" हेच पुस्तक शिकवावे व जून, १९९४ पासून "चित्रवाणी वैभवम्" हे पुस्तक शिकवावयाचे आहे. तसेच "पाईयमंजरी" हे अर्धमागधीचे पुस्तक १९९३-९४ पासून लागू करण्यांत आले आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ७४/१९९३ जा.क्र. उमवि/९३/७अ/१३९१, दि. २४.५.१९९३ अन्वये सत्रांत परीक्षा [टर्म एण्ड] सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्यांत आल्याचे आपणांस कळविण्यांत आले आहे. त्यामुळे संस्कृत/अर्धमागधी या विषयासाठी पूर्वीची सत्रनिहाय केलेली अभ्यासक्रमाची विभागणी रद्द करण्यांत आली असून प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष/एम.ए.भाग-१ या वर्गाचा संस्कृत अर्धमागधी विषयाचा अभ्यासक्रम सोबत जोडून पाठविला आहे.

मा.प्राचार्य यांना विनंती की, सदर पत्राचा आशय सर्व संबंधित प्राध्यापकांच्या व विद्यार्थ्यांच्या नजरेस आणावा व त्यानुसार कार्यवाही करावी.

आपला विश्वासू,

[signature]

उप कुलसचिव.

प्रत माहितीसाठी सादर :-

१] मा.अधिष्ठाता, कला विद्याशाखा, उ.म.वि., जळगांव.
२] मा.चेअरमन व सदस्य, संस्कृत अभ्यास मंडळ, उ.म.वि., जळगांव.
३] मा.कुलसचिव, उ.म.वि., जळगांव.
४] मा.उपकुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध/उत्तरार्ध, प्रशासन, शैक्षणिक विभाग, उ.म.वि., जळगांव.
५] मा.सहा.कुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध/उत्तरार्ध, प्रशासन, शैक्षणिक, पात्रता, सभा व अभिलेख विभाग, उमवि., जळगांव.

दुबासा./-